# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

सर्व्हे क्र.८३२ अ, फायनल प्लॉट क्र.१७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४


## -: निवेदन :-

**उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी "वरिष्ठ वेतनश्रेणी" व "निवडश्रेणी" सेवांतर्गत प्रशिक्षण-२०१८**

उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी सेवान्तर्गत प्रशिक्षण माहे **मे/जून २०१८ मध्ये** विभागीय मंडळनिहाय आयोजित करावयाचे आहे. प्रशिक्षणासाठी अर्हताकारी सेवा पूर्ण झालेल्या शिक्षकांनी वरिष्ठ वेतनश्रेणी / निवडश्रेणी प्रशिक्षण घेण्याकरिता Online अर्ज सादर करावयाचे आहेत. मंडळाच्या **http://traning.mh-hsc.ac.in या वेबलींकवर दि.३०/११/२०१७ पर्यंत** प्रशिक्षणनिहाय वेगवेगळे / स्वतंत्र Online फॉर्म/अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे.

शिक्षकांनी प्रशिक्षणासाठी Online भरलेल्या अर्जाची प्रिन्ट घेऊन आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्यामार्फत संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (माध्य.)/ विभागीय शिक्षणउपसंचालक या कार्यालयांकडे तातडीने पाठविण्याची व्यवस्था करावी.

**"वरिष्ठ वेतनश्रेणी" व "निवडश्रेणी" प्रशिक्षणासाठी विहित पध्दतीने संबंधित कार्यालयाकडे अर्जाची प्रिंट सादर केलेल्या शिक्षकांची शैक्षणिक व व्यवसायिक अर्हता तपासून-पडताळणी करुन प्रशिक्षणासाठी पात्रतेच्या शिफारशीसह ज्या शिक्षकांची नावे मंडळाकडे प्राप्त होतील अशाच शिक्षकांना प्रशिक्षणात सामावून घेण्यात येईल.** दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | प्रशिक्षण | अर्हता |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ वेतनश्रेणी | १) माहे मे २०१८ पर्यंत **१२ वर्षे पूर्ण** व त्याहून अधिक सेवा झालेले व विहित शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता पूर्ण करणारे **कार्यरत** शिक्षक. *( ११ वर्षे व १० वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांनी सुध्दा नाव नोंदणी करण्यास हरकत नाही.)* |
| २ | निवडश्रेणी | १) माहे मे २०१८ पर्यंत **२४ वर्षे पूर्ण** व त्याहून अधिक सेवा झालेले व विहित शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता पूर्ण करणारे **कार्यरत** शिक्षक. २) एम.एड. अथवा एम.फील. अथवा पी.एच.डी. अथवा एम.एस.ए.सी.आय.टी (MSACIT) *( २३ वर्षे व २२ वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांनी सुध्दा नाव नोंदणी करण्यास हरकत नाही.)* |

**टिप:-** *प्रशिक्षणासाठी शिफारशीसह प्राप्त झालेल्या शिक्षकांच्या नावांनुसार प्रशिक्षणाची केंद्रे निश्चित करताना आवश्यकतेनुसार क्रमश: १२, ११, १० व २४, २३, २२ वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांचा प्रशिक्षणासाठी विचार केला जाईल. अशा शिक्षकांना प्रशिक्षणात सामाऊन घेणे अथवा न घेणे हा निर्णय सर्वस्वी मंडळाचा राहील. त्याबाबत कोणासही आग्रह धरता येणार नाही, याची नोंद घ्यावी.*

**दिनांक: ०६/०९/२०१७**
**राज्य मंडळ, पुणे-०४.**

(कृष्णकुमार पाटील)
सचिव
राज्य मंडळ, पुणे.

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,नागपूर विभागीय मंडळ, नागपूर–४४० ००१

पत्र क्रमांक:नाविमं/संशोधन/प्रशिक्षण/ ४८९६
नागपूर, दिनांक ०३.१०.२०१७

प्रति,

संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जुने सचिवालय,सिव्हील लाईन्स, नागपूर

उपरोक्त प्रकटन कृपया आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व वृतपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.

सहपत्र– १० प्रती

विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर